# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

May 2020 Special Issue- 27 Vol. 1


# RADIANCE


Chief Editor
Mr. Arun B. Godam

Editor
Dr. Sunita Sangole
Dayanand College of Arts, Latur

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**SPECIAL ISSUE – 27 Vol. 1 ,** RADIANCE

**Editor - Dr. Sunita Sangole**

**© All rights reserved with the College & publisher Price : Rs. 400/-**

**Chief Editor – Arun Godam**
**Latur**

**Published BY**
Shaurya Publication
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com , 8149668999

**Printed By.**
**Shaurya Offset**
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com

**EDITION : May 2020**

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 27 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
May 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# औद्योगिकीकरण आणि मराठी कादंबरी

**डॉ. गणेश लहाने**
मराठी विभाग, दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

**प्रास्ताविक :-**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी भारत सरकारने वाडी, वस्त्या, तांडे इ. ठिकाणी शाळा उघडून जनसामान्य माणसांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. या शिक्षणाच्या संधीचा फायदा घेऊन ग्रामीण भागातील नवतरूण मंडळीनी आपल्या शेती, शेतकरी यांचे प्रश्न व समस्यांचे वास्तव चित्रण साहित्यात कोठे आले आहे काय ? याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. पण शेतकऱ्यांचे प्रश्न, समस्या केवळ संवेदनेतून चित्रित झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे आपण भोगलेल्या, अनुभवलेल्या दुःखाचे, समस्यांचे चित्रण करण्यासाठी १९६० च्या आसपास जाणिवेची व वेदनेने होरपळलेली पिढी लिहू लागली. या पिढीने आपल्या साहित्यात सरंजामी परंपरा आणि आधुनिकता, यंत्रयुग आणि ग्रामीण जीवन, जात आणि धर्मातील ताणतणाव या आणि अशाच अनेक समस्या व प्रश्न आपल्या साहित्यातून मांडल्या. त्याला कादंबरी हा वाङ्मय प्रकारही अपवाद राहू शकला नाही. १९६० ते १९८० या कालखंडातली कादंबरी वास्तव जाणिवा चित्रित करू लागली. पण १९८० च्या नंतर मात्र कादंबरीमध्ये आमूलाग्र बदल होऊ लागले. आजपर्यंत जे अनुभवविश्व साहित्याच्या कक्षेबाहेर राहिले ते आता व्यापक प्रमाणात साहित्यात विशेषतः कादंबरीमध्ये चित्रित होऊ लागले हे सांगताना डॉ. नागनाथ कोतापल्ले म्हणतात की, "अमुक एक वास्तव आकाराला येण्याचे कारण कोणते याचा शोध लेखक घेऊ लागले. म्हणजे येथे नुसते वास्तव नाही, तर या वास्तवाच्या जडणघडणीमागील कारणे या कालखंडातील लेखकांना महत्त्वाची वाटू लागली." अशा अनेक कारणांचा शोध घेऊन लिहिण्याचे काम १९८० नंतर मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसून येते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विकास आणि नियोजनावर भर देण्यात आला. पण विकासाच्या नावाखाली सामान्य जनता मात्र भरडून निघाली. त्यापैकीच विकासाचा एक टप्पा म्हणजे धरण हा होय. 'पाणी आडवा आणि पाणी जिरवा' या मोहिमेअंतर्गत मोठी धरणे बांधून शेतीला पाणी पुरवठा करण्याचे ठरले. मोठ - मोठी धरणे, प्रकल्प उभारणीही वेगाने झाली. पण ज्यांच्या शेतात, गावात अशी धरणे उभी राहिली त्या माणसांना मात्र देशोधडीला लागण्याची वेळ आली कारण धरण बांधण्यापूर्वी शासनाने धरणात घर व जमीन गेलेल्यांचे पुनर्वसन करण्याचे आश्वासन दिले पण वास्तवात मात्र तसे झाल्याचे दिसून आले नाही. याचे चित्रण विश्वास पाटील यांनी 'झाडाझडती' या कादंबरीमधून समर्थपणे केल्याचे दिसून येते. धरणग्रस्तांचे प्रश्न तर सोडवले जातच नाहीत परंतु त्यांच्यावर दादागिरी करणे, त्यांच्या मुलीबाळींच्या इज्जती लुटणे, धरणग्रस्तांच्या सोयी-सुविधा प्रस्थापितांना देण्याचे काम येथील भ्रष्ट सरकारने व अधिकाऱ्यांनी केले. येथील जनतेचा धरणाला कधीच विरोध नव्हता व नाही पण किमान आमचे पुनर्वसन व्हावे हीच त्यांची मागणी होती. या संदर्भात 'झाडाझडती' कादंबरीत आवडाबाई मंत्र्याला म्हणते, "साहेब कवा केला आमी धरणाला विरोध ! तुमचं धरण होऊ दे ! पण जित्यापणी मरण नको एवढंच मागणं होत तुमच्या दरबारात."[२] अशा प्रकारची मनाला सुन्न करुन अंतःकरण पिळवटून टाकणारे दुःख विश्वास पाटलांनी 'झाडाझडती' या कादंबरीमधून मांडले आहे.

'झाडाझडती' शिवाय त्र्यंबक असरडोहकर यांच्या 'काळी आई' कादंबरीत धरणात गेलेल्या जमिनीच्या आलेल्या पैशामुळे शेतकरी कसे व्यसनाधीन झाले याचे चित्रण आले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात धरणाचे पाणी आल्याने ऊसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊ लागले म्हणून ग्रामीण भागाचा विकास करण्याच्या निमित्ताने साखर कारखान्याची उभारणी केली गेली. कारखानदारांनी शेतकरी व ऊसतोडीचे काम करणाऱ्या लोकांच्या हिताकडे न पाहता स्वतःच्या स्वार्थाचा विचार केला. या गोष्टीकडेही कादंबरीकारांनी जीवनवादी व शोधक दृष्टीने पाहिले. ऊसतोडीचे काम करणाऱ्या मजुरांचे प्रश्न, त्यांच्या समस्या समाजाला, कारखानदारांना, समाजाला, देशाला कळाव्यात यासाठी सुरुवातीस बा.ग. केसकर यांनी 'कुणाच्या खांद्यावर' ही कादंबरी लिहून ऊसतोड कामगारांचे शोषण कसे होते. हे पहिल्यांदा समर्थपणे वाचकांच्या समोर ठेवले. यानंतर मात्र सरदार जाधवांनी 'कोयता', डॉ. नारायणराव मुंढे यांनी 'मागे फिरा पतंगांनो', सुभाष राजुळे यांनी 'ताडातोड', शांता जोशी यांची 'गव्हानी' अशा अनेक कादंबऱ्या वाचकांच्या समोर येत राहिल्या. या सर्वच कादंबऱ्यामधून कारखानदार, बागायतदार व मुकादम ऊसतोड कामगारांवर कसा अन्याय करतात याचे हृदयद्रावक वर्णन आलेले आहे. एवढेच नाही तर ऊसतोड कामगारांच्या सुंदर बायका व

एकंदरीत औद्योगिकीकरणाच्या नंतरच्या कादंबरीने समकालीन समाजवास्तवाची जाणिव ठेवून तत्कालिन समस्या चित्रित केल्या. त्यामुळे मराठी कादंबरी विश्वाला अपरिचित असणाऱ्या अनेक गोष्टी परिचित झाल्या आणि मराठी कादंबरीचा प्रांत अनुभवविश्वांनी समृद्ध होण्यास मदत झाली.

**संदर्भ सूची :**

१. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, 'साहित्याचा अवकाश', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. १५ ऑगस्ट २००३, पृ.क्र. २१३.
२. विश्वास पाटील, 'झाडाझडती', राजहंस प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती १९९४, पृ.क्र. ३१९.
३. शेषराव मोहिते, 'असं जगणं तोलाचं', प्रकाशक देशमुख आणि कंपनी, पुणे, तृ.आ. १९९८, पृ.क्र. ७०.
४. सदानंद देशमुख, 'बारोमास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००२, पृ.क्र. ३४९.
५. डॉ. शंकर विभुते, 'स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. २६ जानेवारी २०१०.

Current Global Review

Indexed (SJIF)

ISSN 2319-8648

Impact Factor- 7.139

ISSN 2319-8648

Chief Editor
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

SHAURYA PUBLICATION
Latur

Publisher
Shaurya Publication

Impact Factor 5.707

ISSN 2349-638x

Peer Reviewed And Indexed

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly e-Journal

VOL-VI | ISSUE-I | Jan. | 2019

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 28 | डॉ. गणेश लहाने | संत तुकारामांच्या अभंगातील समाजचित्रे | 121 To 123 |
| 29 | ज्योत्सना भागवतराव गव्हाणे | सर्व शिक्षा अभियान योजनेद्वारे राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांच्या अंमलबजावणीचा अभ्यास | 124 To 125 |
| 30 | डॉ. सुनील गुलाबसिंग जाधव | विधवाओं के दर्द का अहसास कराती निराला की "विधवा" कविता | 126 To 129 |
| 31 | प्रा. ए. बी. जाधव | पंडित नेहरु आणि धर्मनिरपेक्षता | 130 To 132 |
| 32 | Dr. Snehlata B. Patil | Female Infertility : An Over View Of Ayurvedic Concept | 133 To 134 |
| 33. | M.V. Dawande<br>S. S. Nerkar | LRS Bianchi type-I Universe in F(T) Theory of Gravity-II | 135 To 139 |


Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# संत तुकारामांच्या अभंगातील समाजचित्रे

**डॉ. गणेश लहाने**
मराठी विभाग
दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

**प्रस्तावना :-**

तेराव्या शतकात महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा पाया उभारला. तर या संप्रदायाचा कळस म्हणून संत तुकाराम महाराजांना ओळखले जाते. म्हणून तर आजही महाराष्ट्रात ज्ञानोबा, तुकाराम आणि ग्यानबा तुकाराम या नावाचा जयघोष केला जातो. लाखो वारक-यांच्या आणि जनसामाण्यांच्या मुखातून सदैव या नावाचा उच्चार होत असतो. संत ज्ञानेश्वरांनी आठरापगड जातीच्या संताना सोबत घेऊन या संप्रदायाला वाढवण्याचे काम केले. त्यातलेच या संप्रदायातील एक देहू गावचे महान संत म्हणजे संत तुकाराम होय. वारकरी संप्रदायाच्या संत मालिकेतील तुकोबा हे अखेरचे महत्त्वाचे संत होत. सामान्यांसारखा संसार करून एक साक्षात्कारी संत होण्याचे भाग्य तुकारामांना लाभले. आपल्या अजोड अभंगवाणीच्या बळावर तुकोबा आज महाराष्ट्राच्या गळ्यातील ताईत झाले आहेत. त्यांनी अनेक विषयावर ५००० अभंगाची रचना केली आहे. या अभंगवाणीतून जनसामान्य माणूस, समाज, समाजातील विविध वृत्ती - प्रवृत्ती चित्रित केल्या आहेत. अशा संत तुकाराम महाराजांचा जीवनपरिचय व अभंगातील विविध जाणिवा खालीलप्रमाणे सांगता येतील.

**जीवनपरिचय :-**

संत तुकाराम महाराजांचा जन्म देहू गावात इ.स. १५९८ मध्ये झाला. त्यांचे पूर्णनाव तुकाराम बोल्होबा आंबिले असे होते. त्यांच्या वडीलांकडे देहूची महाजनकी होती. सावकारी, शेती आणि गावात चांगले किराणा दुकान असल्यामुळे घरची आर्थिक परिस्थिती चांगली होती. "सर्व प्रकारची अनुकूलता असताना अचानक दुःखाचे तीव्र तडाखे त्यांच्या कुटुंबाला बसू लागले. तुकाराम सतरा वर्षांचे असताना त्यांचे आई-वडील वारले. वास्तविक घराण्याचा व्यवसाय तुकोबांनी नुकताच हाती घेतला होता. यावेळी वडिलांच्या मार्गदर्शनाची त्यांना गरज होती. अशा अवस्थेत महाजनकीत स्थिरावणे तुकोबांना अशक्य होते. सावजी उदासीन वृत्तीचा असल्याने तुकोबांना मार्गदर्शन करणारे कोणी वडिलधारे माणूस उरलेच नाही."[१] अशा परिस्थितीत महाराष्ट्रात इ.स. १६२८ मध्ये दुष्काळ पडला. अन्नपाण्याअभावी गुरेढोरे, पशुपक्षी तडफडून मेले. यातच तुकारामांचा व्यवसाय बुडाला, शेती संपुष्टात आली. दरम्यानच्या काळात पहिली पत्नी रखुमाबाई वारली त्यापाठोपाठ मुलगा संतुही वारला. कुटुंबाची झालेली वाताहत त्यांनी डोळ्यासमोर पाहिली या अनेक घटनांचा परिणाम त्यांच्या मनावर झाला आणि संसाराची विरक्ती, उदासीनता आल्यामुळे संत तुकारामांनी संसाराकडे पाठ फिरवली. यातूनच ते अभंग निर्मितीकडे वळले अनेक विषयावर अभंग लिहिले त्या अभंगातून पुढील भाव जाणवतात.

**१) तुकारामांचे कवित्व :-**

संसारी जीवनातून विरक्त होत संत तुकारामांनी आपले मन विठ्ठल भक्तीकडे वळवले. देहू गावच्या बाजूस असणा-या भंडा-या डोंगराचा आश्रय त्यांनी घेतला. लोकांत नाकारून एकांत स्वीकारला. एकांतात त्यांनी विठ्ठलाचे नामस्मरण सुरु केले अनेक अभंगाची निर्मिती ते करू लागले पण या निर्मितीचे श्रेय त्यांनी स्वतःकडे न घेता परमेश्वराकडे दिले आहे. याविषयी आपल्या अभंगात तुकाराम महाराज म्हणतात की,

"नामदेवें केले स्वप्नामाजी जागे।
सवे पांडुरंगे येवोनिया।।
काम करावे कवित्त्व
वाउगे निमित्य बोलो नये।।"[२]

अशी आपल्या कवित्त्वाबद्दलची स्फूर्तीची साक्ष स्वतः संत तुकाराम देतात. आपण जी अभंगाची निर्मिती करतो ती मी स्वतः करत नसून माझ्याकडून देवच ही निर्मिती करून घेतो.

**२) संत तुकारामांचे आत्मचरित्रपर अभंग :-**

संत तुकारामांनी आपल्या अभंगात स्वतःचे चरित्रही लिहिलेले दिसून येते. स्वतः बरोबरच आपले कुटुंब, कुटुंबावर आलेल्या आपत्तीविषयी, स्वतःची वैराग्य भावना, मोठ्या

भावाची संन्यासीवृत्ती दुष्काळाचे भयानक वर्णन, त्यात पत्नी आणि मुलाचा झालेला मृत्यू, व्यापारात निघालेले दिवाळे अशा एक ना अनेक गोष्टींचे वर्णन संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगात केलेले आहे. ते एका अभंगात म्हणतात की,

"बरे झाले देवा निघाले दिवाळे।
बरी या दुष्काळे पीडा केली।।
अनुतापे तुझे राहिले चिंतन।
जाला हा वमन संसार।।"[३]

या अभंगातून महाराजांच्या विरक्त वृत्तीचे दर्शन घडते. भयान दुष्काळात व्यापाराचे दिवाळे निघाले, गुरेढोरे, धनधान्य, बायको - मुलगा सर्व संपून गेले तरी महाराज देवाला बरे झाले असे म्हणतात. तुकारामांच्या या स्वभावाबद्दल डॉ. किशोर सानप व मनोज तायडे लिहितात की, "समाजातील दुःख, धार्मिक वातावरण त्यांनी जवळून पाहिले. गीता, वेद, शास्त्रे, पुराणे वाचून काढली. त्यात धर्माचा अर्थ शोधला. शेवटी देहूजवळच्या भामनाथ, घोराड्या, भंडा-या डोंगरावर जाऊन त्यांनी तपःसाधना, चिंतन - मनन - ध्यान - धारणा करुन पाहिली. वेदांनी सांगितलेला देव शोधून पाहण्यासाठी त्यांनी तपसाधनादी सोपस्कार पार पाडले. त्यांच्या मनाचे ह्यामुळे समाधान झाले नाही. मग ते विठ्ठलाच्या भक्तीकडे जीव लावून वळले."[४]

असा संत तुकारामांच्या आत्मविकासाचा प्रवास त्यांच्या आत्मचरित्रपर अभंगातून अधोरेखित झाला आहे.

### ३) अभंगातील विठ्ठलभक्तीची ओढ :-

संत तुकारामांच्या अभंगातून विठ्ठल भक्तीची प्रखर ओढ आलेली दिसून येते. हरिनामाचा छंद लागल्यानंतर त्यांना सर्व चराचर सृष्टीत परमेश्वर असल्याचे जाणवत होते. त्यांच्या या साधकावस्थेत त्यांचे मन कधी उदासिन व्हायचे, कधी ते गांगरून जायचे अशा वेळी त्यांची विचित्र अवस्था व्हायची. वाट दाखवणारे कोणी जवळ नाही. ना कुणाचा आधार ना कुणाचे मार्गदर्शन, त्यावेळी तुकाराम महाराज म्हणतात,

"कोणाच्या आधारे करू मी विचार।
कोण देइल धीर माझ्या जीवा।।"[५]

आपल्या मनाला आधार देणारे कोणीच नसल्याने विठ्ठल हाच त्यांना खरा आधार वाटायचा पण देवही भेटीला येत नव्हते त्यावेळी त्यांची अवस्था अजूनच वाईट व्हायची आपल्या मनातील ही आर्तता व्यक्त करताना तुकाराम महाराज म्हणतात,

"कन्या सासुरासी जाये। मागे परतोनी पाहे।।
तैसे झाले माझ्या जीवा। कधी भेटसी केशवा।।
चुकलिया माये। बाळे वेळोवेळा पाहे।।
तुका तैसा तळमळी। जळावेगळी मासोळी।।"[६]

अशा प्रकारची विठ्ठल भक्तीची आर्त ओढ तुकाराम महाराजांच्या अभंगातून जाणवते.

### ४) प्रापंचिकांना उपदेश :-

संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून प्रापंचिकांना उपदेश केला आहे. समाजातील अनेक सामाजिक दोषांवर त्यांनी घाव घातला. समाजातील व्यर्थ चालीरिती, परंपरा, अज्ञान, अंधश्रद्धा यावरही त्यांनी जोरदार टिका केली. संसारी माणसाने आपले जीवन जगत असताना आणि पैसा मिळवत असताना तो कसा मिळवला पाहिजे हे सांगताना ते म्हणतात,

"जोडोनिया धन उत्तम व्यवहारे। उदास विचारे वेच करी।।
उत्तमचि गती तो एक पावेल। उत्तम भोगील जीवखाणी।।"[७]

उत्तम किंवा चोख व्यवहार करून पैसा मिळवावा आणि चांगल्या कामासाठी तो मोठ्या मनाने खर्च करावा. दुस-यावर परोपकार करावेत. कोणीचीही निंदा करू नये. परस्त्री ही मातेसमान, बहिणीसमान मानावी. दुस-याचा कधी मत्सर करू नये, भुकेल्या माणसाला अन्न आणि तहानलेल्या माणसाला पाणी द्यावे. हेच ख-या अर्थाने संसारी माणसाचे जगणे असते. असे तुकाराम महाराज आपल्या अभंगात सांगतात.

### ५) अभंगातील जीवनानुभवाचे सार :-

संत तुकारामांच्या अभंगातील मानवी जीवनातील सार आलेला दिसून येतो. शब्दांच्या माध्यमातून त्यांना बंदिस्त करत असताना तुकाराम महाराजांनी आपल्या सभोवतीचे अनेक उदाहरणे दिले आहेत. आपले विचार पटवून देण्यासाठी त्यांनी सहज - सुलभ भाषेचा वापर केलेला आहे. मानवी जीवनानुभवाचे सार सांगताना संत तुकाराम आपल्या अभंगात म्हणतात की,

"चोरासी चांदणे वेश्येसी सेजार।
परिसेंसी खापर काय होय।
"मोले घातले रडाया। नाही आसू नाही माया।
कोडियाचे गोरेपण। तैसे अहंकारी मन।।"[८]

तुकाराम महाराजांनी या आणि अशाच अनेक अभंगातून मानवी जीवनातील सार अनेक उदाहरणांच्या माध्यमातून सांगितले आहे.

**६) समाजातील ढोंगीप्रवृत्तीवर हल्ला :-**

संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून समाजातील ढोंगी प्रवृत्तीवर हल्ला चढवला आहे. धर्माच्या नावावर समाजाला लुबाडणारे ढोंगी लोक, संन्यासी असल्याचे सांगून विषयाचा भोग घेणा-या, नास्तिक प्रवृत्ती असलेल्या संताचा मत्सर करणारे, चोरी करणारे अशा प्रवृत्तीवर हल्ला चढवताना तुकाराम महाराज म्हणतात की,

"दावुनि वैराग्याची कळा
भोगी विषयाचा सोहळा।
पाया झाला नारू। तेथे न बांधा कापुरु।।
तेथे बिबव्याचे काम। अधमासि तो अधम।।"[९]

जशास तसा न्याय सांगून तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून समाजातील ढोंगीपणावर हल्ला चढवला आहे.

**७) अभंगातील प्रतिमासृष्टी :-**

संत तुकारामांच्या अभंगवाणीचे अंत:रंग हे प्रतिमासृष्टीने खचाखच भरलेले आहे. व्यावहारिक जीवनातील, दैनंदिन, सामान्य माणसाच्या आयुष्यातील अशा प्रतिमांचा वापर तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगवाणीतून केलेला आहे. अभंगातील या प्रतिमासृष्टीविषयी डॉ. मालती पाटील म्हणतात की, "प्रतिमानांच्या भाषेत बोलणे ही तुकारामांची सहजप्रवृत्ती असल्याने त्यांची काव्यसृष्टी प्रतिमानांनी खच्चून भरलेली आहे. उत्तम प्रतीच्या काव्यात प्रतिमाने असतातच.'[१०] याशिवाय रूपक, दृष्टांत, उपमा तुकारामांनी आपल्या अभंगात अनेक ठिकाणी वापरलेले दिसून येतात याचेच एक प्रतिबिंब खालील अभंगात जाणवते.

"परिमल म्हणून चोळूं नये फूल। खाऊ नये मूल आवडते।।
काय एक नव्हें धरितां अंतरी। कासवीचे परी वेळोवेळा।।
मोतियाचें पाणी चाखूं नये स्वाद। यंत्र भेदूनि नाद पाहू नये।।
कर्मफळ म्हणुनी इच्छू नये काय। तुका म्हणे कर्म दावूं
लोकां।।'[११]

या अभंगात ते म्हणतात कर्म फळाची आपेक्षा धरून कर्म करू नये, फुलाचा मधुर सुगंध आला म्हणून चोळून टाकू नये, मूल आवडते म्हणून कोणी खाते का ? मधुर ध्वनीचे वाद्य फोडून कोणी त्याचा नाद पाहू नये त्याचप्रमाणे कर्म देणारी फळे असली तरी इच्छा धरून कर्म करू नये.

याशिवाय बहुरुपी, बगळा, मांजर, हरीण, चंदन, कुंभार, घोडा, गाढव, कुत्रा, मासा, हत्ती, पर्वत, वाळू, शिंपला, कापुर, बुक्का, चंद्र - चांदणे, ग्रह अशा कितीतरी प्रतिमा संत तुकारामांनी आपल्या अभंगात वापरलेल्या दिसून येतात.

अशा प्रकारे संत तुकारामांच्या अभंगातून विविध भाव - भावना, कल्पना, प्रतिमा, दृष्टांत, रूपक यांचा वापर करुन समाजाचे सुंदर चित्रे अभंगातून मांडलेली दिसून येतात.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. यादव आनंद - एका लेखकाचा अभ्यास : मध्ययुगीन तुकाराम य.च.मु.वि. नाशिक, प्र. आ. २०१०, पृ.क्र. ५.
२. नसिराबादकर ल. रा. - 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, सातवी आ. २००३, पृ.क्र. १२५.
३. तत्रैव - पृ.क्र. ३३.
४. सानप किशोर, तायडे मनोज - 'तुकाराम : व्यक्तिमत्त्व आणि कवित्त्व, पृ.क्र. २०.
५. तत्रैव - पृ.क्र. १२६.
६. तत्रैव - पृ.क्र. १२६.
७. तत्रैव - पृ.क्र. ३७.
८. तत्रैव - पृ.क्र. १३१.
९. तत्रैव - पृ.क्र. १३०.
१०. तत्रैव - पृ.क्र. ४९.
११. तत्रैव - पृ.क्र. ४९.
१२. संत तुकारामांची अभंगगाथा.